# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31/08/2023 (गुरूवार) सकाळ


## श्री. हर्ष पोद्दार भा.पो.से. यांनी पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण पदाचा कार्यभार स्विकारला

दि. ३१/०८/२०२३ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलामध्ये नवनियुक्त पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार यांचे आगमण झाले असून त्यांनी मावळते पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद यांचेकडून पदभार स्विकारला आहे. श्री. हर्ष पोद्दार हे सन २०१३ बॅचचे आय.पी.एस. अधिकारी आहेत. त्यांनी यापुर्वी नागपूर शहर झोन ५ चे पोलीस उप आयुक्त तसेच बीड जिल्हयाचे पोलीस अधीक्षक म्हणुन काम केले आहे. पोलीस अधीक्षक यांनी कार्यालयातील सर्व शाखेमध्ये भेट देवून निरीक्षण केले व आवश्यक सुचना दिल्या.




**श्री हर्ष पोद्दार, भापोसे, पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण**

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत २४ कि.मी अंतरावरील मौजा आसोली शिवार येथे दिनांक २९/०८/२०२३ चे १३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रिराम गोपाळराव चंडीमेश्राम, वय ५२ वर्ष, रा. आसोली ता. कामठी जिल्हा नागपुर याचा भाऊ नामे– बबन गोपाळराव चंडीमेश्राम हा आपल्या १५ बकऱ्या चारण्याकरीता आसोली शिवारात नाग नदीच्या काठावर गेला असता आरोपी भगवे कपडे घातलेला महाराज इसम वय अंदाजे ४५ वर्ष रा. आसोली यांच्यामध्ये वादविवाद झाला त्यावरून फिर्यादीचा भाऊ जखमी हा आसोली टाटा जायका मोटर्स चाय टपरी जवळ उभा असता आरोपी हा तेथे येवून हातात टिकाशीचा दांडा घेवून आला व फिर्यादीचा भाऊ बबन गोपाळराव चंडीमेश्राम याच्या डोक्यावर मारून याला गंभीर जखमी केले व जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक नगराळे मो. क्र. ९८२३१४५९४७ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. एम आय डी सी बोरी** :– अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील टाकळघाट येथे दिनांक ३०/०८/२०२३ चे १२. ३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. रेखा कालीदास शंभरकर, वय ४२ वर्ष, रा. कोजबा पोस्टे आरमोरी जि. गडचिरोली ही टाकळघाट विक्तुबाबा देवस्थानात दर्शना करीता आली होती. पोहा खाण्याकरीता मंदीरातील गेट क्र. १ जवळ रांगेत लागली होती. उमराचे झाडा जवळ उभी होती तेव्हा तिची एक काळया मण्याची पोत त्यात पोत अडीच ग्रामचे पदक जुने ४ ग्रॅम गहु मनी व १ ग्रॅमचे बारीक मणी एकुण ३०,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून घेवुन गेला.

तसेच फिर्यादी सौ. सुशमा चंन्दमनी मुल वय ६० वर्ष रा. भीमनगर, ता. हींगणघाट जि. वर्धा ही सुद्धा टाकळघाट विक्तुबाबा देवस्थानात दर्शना करीता आली असता भोजनालय कक्षा समोर रांगेत लागली होती तेव्हा फिर्यादीचे गळयात काळया मण्याची पोत होती त्यात ३ ग्रॅमचे सोन्याचे डोरले, २ ग्रॅमचे सोन्याचे गहु मनी व १ ग्रॅमचे बारीक मनी असा एकुण ४०,०००/– रूपयाचा मुद्देमाल रांगेत असतांना कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून घेवुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार पांडे मो. नं. ८८८८८३८९९५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**